महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in


जा.क्र.पुविम / उमा अ / 6685
दिनांकः– 18 / 12 / 2024
20

प्रति,
मुख्यध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यता प्राप्त शाळा व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयये
जिल्हा–पुणे, अहमदनगर, व सोलापुर

विषय– फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये आयोजित करावयाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षांची अंतिम वेळापत्रके जाहीर करणेबाबत
संदर्भ– जा.क्र.– रा.मं./परीक्षा–६/३२०४, दि. १२.०८.२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेची अंतिम वेळापत्रके मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. २१।१२।२०२४रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खालील कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशिल | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा कालावधी (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ | शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२५ ते सोमवार, दि. १७ मार्च, २०२५ |
| २. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ ते सोमवार, १० फेब्रुवारी २०२५ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांची प्रात्यक्षिक परीक्षेसह) | सोमवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२५ ते गुरूवार, दि. २० फेब्रुवारी २०२५ (शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षेसह) |
| ३. | आऊट ऑफ टर्न (प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा) | दि . १२, १५ व १७ मार्च २०२५ | मंगळवार, दि. १८/०३/२०२५ ते गुरूवार, दि. २०/०३/२०२५ |
| ४. | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा (इ.१०वी) | ........... | मंगळवार, दि. १८/०३/२०२५ ते शुक्रवार, दि. २८/०३/२०२५ |

विद्यार्थी संख्येनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता घेण्याबाबत सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

१. इ.१०वी विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचे आयोजन उपरोक्त कालावधीत पार पाडण्याची जबाबदारी संबंधीत माध्यमिक शाळांची राहील.

२. इ.१०वीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा सोबतचे परिशिष्ठानुसार शालेय स्तरावर आयोजित करण्याबाबत संबंधीतांना कळविण्यात यावे. त्यानुसार पूर्वसूचना देवून संबंधीत विषयांचा प्रश्नपत्रिकेचा संच मिळण्याकरिता पुणे विभागीय मंडळाशी तातडीने संपर्क साधावा.

३. इ.१२वीचे परीक्षेचे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामार्फत घेण्यात यावी.

४. इ.१०वी व इ.१२वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी प्रचलित पध्दतीने अंतर्गत (Internal) व बहिस्थ (External) परीक्षकांची नियुक्ती करावी. बहिस्थ परीक्षक नियुक्त करतांना शक्यतो शाळेच्या /कनिष्ठ महाविद्यालयाच्या जवळच्या परिसरातील साधारणत: ८ कि.मी.च्या परीघातील नेमावेत.

५. इ.१२वी माहिती तंत्रज्ञान (I.T.), सामान्यज्ञान (G.K.) विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात यावी. यासाठी वेळापत्रकात प्रत्येक विषयासाठी दोन सत्र देण्यात आलेले आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेशा कालावधी आधी माहित करून देणे आवश्यक आहे. जेणेकरून कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही. तशा सूचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात.

उपरोक्त प्रमाणे निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी वैद्यकीय/अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व तत्सम परीक्षा देवू न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची सदर परीक्षा, लेखी परीक्षेनंतर Out of Turn द्वारे निर्धारित कालावधीतच आयोजित करण्यात यावी.

( औंदुंबर उकिरडे )
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे

## माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी–मार्च २०२५ नियमित व पुनर्परिक्षार्थी म्हणून प्रविष्ट दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विषय योजनेपैकी कार्यशिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रक

| अ.क्र. | विषय सांकेतांक | विषयाचे नाव | वार | दिनांक | सत्र |
|---|---|---|---|---|---|
| १. | जे १ | घरगुती विद्युत उपकरणे / Electrical Domestic Appliances | मंगळवार | १८/०३/२०२५ | दुपार |
| २. | जे ५ | दूध व दूधाचे पदार्थ / Milk And Milk Products | गुरूवार | २०/०३/२०२५ | दुपार |
| ३. | जे ९ | हस्तभरतकाम / Hand Embroidery | शुक्रवार | २१/०३/२०२५ | दुपार |
| ४. | के १ | शिवणयंत्राव्दारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरूस्ती / Stiching with Sewing Machine and its Repairing and Maintenance | शनिवार | २२/०३/२०२५ | दुपार |
| ५. | के ५ | टाकाऊ वस्तूपासून सौंदर्याकृती / Preparation of Decorative pieces by utilization of waste material | सोमवार | २४/०३/२०२५ | दुपार |
| ६. | एल ७ | पाककला / Cookery | मंगळवार | २५/०३/२०२५ | दुपार |
| ७. | एम ३ | भारतीय संगीत (गायन–वादन) / Indian Music (Vocal & Instrumental) | बुधवार | २६/०३/२०२५ | दुपार |
| ८. | एम ६ | चित्रकला व रंगकाम / Drawing and Painting | गुरूवार | २७/०३/२०२५ | दुपार |
| ९. | एम ७ | कागदकाम, पुठ्ठाकाम व पुस्तकबांधणी / Paperwork, Cardboard work and Bookbinding | शुक्रवार | २८/०३/२०२५ | दुपार |